श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे
श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र
जुलै २०२५ | वर्ष – १३ अंक –७ | मासिक, पाने १२ | Regn.No. - MAHMAR/2022/86035

# २०२४–२५च्या शालांत परीक्षेतील गुणवंतांचा गौरव सोहळा साजरा




*इ. दहावीतील प्रथम क्रमांकप्राप्त कु. अनुष्का सकपाळ हिचा सत्कार करताना प्रा. डॉ. भास्कर मोरे; सोबत डावीकडून जान्हवी चाळके, शरयू यशवंतराव, कल्पेश जुवेकर आणि प्रज्ञा पारकर*

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट इंग्लिश मीडियम स्कूल, डेरवण येथे माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा २०२४–२५चा बक्षीस वितरणाचा कार्यक्रम प्राणीशास्त्राचे प्राध्यापक डॉ. भास्कर मोरे, यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

ईशस्तवनाने कार्यक्रमाची मंगलमय सुरुवात करण्यात आली. शिक्षिका प्राची गोखले यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रशालेच्या संचालिका शरयू यशवंतराव यांनी सर्वप्रथम सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यशाचा पहिला टप्पा पार करत असताना हुरळून न जाता या मिळालेल्या यशात सातत्य ठेवणे आवश्यक असल्याची आठवण त्यांनी करून दिली. जिद्द, चिकाटी व मेहनत या त्रिसूत्रीवर यशाची अनेक शिखरे यशस्विरीत्या तुम्ही पार कराल असा आशीर्वादपर विश्वास व्यक्त केला. तसेच संस्कृत विषयात अकरा विद्यार्थ्यांनी शंभरपैकी शंभर गुण प्राप्त करून शाळेत एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे त्यामुळे पुढील दहावीच्या विद्यार्थ्यांनी हे लक्षात घेऊन अभ्यास करणे आवश्यक आहे असे सांगताना मुलांचा उत्साह वाढवला.

यशस्वी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी संस्थेच्या हितचिंतकांनी रोख रकमेची पारितोषिके जाहीर केली असून दरवर्षी प्रशालेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येतो. इयत्ता दहावीतील कु. अनुष्का सकपाळ (९७.६०%), कु. धैर्य पवार (९४.६०%), कु. मीरा पोंक्षे (९४.६०%) तसेच इयत्ता बारावीतील कु. मित अग्रवाल (८३.४०%), कु. कशफ जाफरी (८०.००%), कु. वैजयंता वाबळे (७५.५०%) या अनुक्रमे प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचा तसेच विविध विषयांत सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा भरघोस रोख पारितोषिके देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आपल्या विषयाचा १०० टक्के निकाल लावणाऱ्या शिक्षकांचा देखील मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त होत असताना शिक्षक




*प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. भास्कर मोरे विद्यार्थ्यांशी संवाद साधताना*

व पालक यांचे विशेष आभार मानले तसेच कोणत्याही शालाबाह्य मार्गदर्शनाशिवाय फक्त शाळेतील अध्यापनावर हे यश प्राप्त झाल्याचे विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून प्रकर्षाने नमूद केले. पालकांनीही आपल्या मनोगतातून शाळा संचालिका, मुख्याध्यापिका तसेच सर्व शिकवणाऱ्या शिक्षकांचे आभार मानले. तुम्ही सर्व शिक्षक विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्यामुळेच आमची मुलं एवढे यश प्राप्त करू शकली असा विश्वासही पालकांकडून व्यक्त करण्यात आला.

प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. भास्कर मोरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत असताना ही शाळा तुम्हाला फक्त ज्ञान देत नाही, तर नर्सरीपासून बारावीपर्यंतच्या तुम्हा सर्व विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा त्याचबरोबर संस्कृतीचे ज्ञानही देत आहे, त्यामुळे तुम्ही सर्व विद्यार्थी खरोखरच भाग्यवान असल्याचे ते म्हणाले. त्याचबरोबर सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या. प्रशालेचे पर्यवेक्षक श्री. कल्पेश जुवेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. 'वन्दे मातरम्'च्या सामूहिक गायनानंतर सर्वांना पेढे वाटून कार्यक्रमाचा समारोप आनंदात आणि गोड आठवणींसह झाला!

# विद्यार्थ्यांनी अनुभवला कल्पकतेचा उत्सव अन कलेची जादू !

शालेय जीवनात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात कला ही अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलतेला लहानपणापासून चालना दिल्याने विद्यार्थ्यांमध्ये नावीन्यपूर्ण विचारसरणी निर्माण होते. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता त्यांचा दृष्टिकोन, व्यक्तिमत्त्व व कलेविषयीची जाण समृद्ध व्हावी, विद्यार्थ्यांच्या अंगभूत सूप्त कलागुणांना विकसित करावे या हेतूने श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज् ट्रस्ट इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षीही कलाकार्यशाळा २०२५चे आयोजन केले.

**कलाकार्यानुभव :**

इयत्ता पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या कलाकृतींमधून नवनिर्मिती साधून कलाकृतींचा आनंद अनुभवला. विद्यार्थ्यांनी निसर्गचित्र, वारली चित्र, मंडळ कला, कार्टून अशा विविध प्रकारांमध्ये रेखाटन व रंगकाम, थंब आर्ट (बोटांच्या प्रिंट), विविध विषयांवर भित्तचित्रे, कागदी फुले, मास्क मेकिंग, ओरिगामी प्रकारातील विविध आकृत्या, स्टोन पेंटिंग, मोझाईक पेंटिंग, क्नाईफ पेंटिंग, स्क्रीन प्रिंट मेकिंग, मोनोप्रींट, लहान मोठ्या आकारांमध्ये पेपर बॅग, आकाश कंदिल निर्मिती, पिस्ताशेल्स पासून चित्रनिर्मिती, कोलाज, टाकाऊ घटकांपासून तसेच कागदी फुलांपासून फ्लॉवर पॉट, पणत्या तसेच इतर सुशोभिकरणाच्या कलाकृती तयार केल्या.

**चित्रकथी :** लोकचित्रकला शैली, कला आणि कथा या कार्यशाळेत श्री. ओंकार जोशी (Indologist) यांनी विद्यार्थ्यांना



*श्री. ओंकार जोशी (Indologist)*

लोकचित्रकला शैलींविषयी मार्गदर्शन केले. आदिवासी चित्रकला (निसर्गाचे) तसेच लोकचित्रकला (सणांचे-संस्कृतीचे) महत्त्व



अधोरेखित करताना, गोवा, कर्नाटक, पैठण या ठिकाणच्या चित्रकथी तसेच मध्यप्रदेशमधील गोंड चित्रकला (प्राणी, माणसं यांची चित्रे) व गुजरातमधील पिठोरा पेंटिंग यांबद्दल माहिती सांगितली. वर्तुळ व लंबवर्तुळ यांच्या आधारे अगदी सोप्याप्रकारे चित्र कसे काढावे व रंगसंगती कशा असाव्यात यांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विविध चित्रकथींमधील डोळे, कान, दागिने यांच्यातील वेगळेपण तपशीलवार सांगितले. विद्यार्थ्यांकडून चित्रकथी काढून घेतल्यानंतर चित्रांवरून कथा कशी तयार करावी याबाबत योग्य मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत चित्रकलेचा आपल्या मानसिकतेवर होणारा सकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांच्या सहजपणे लक्षात आला. या मनोरंजक कार्यशाळेत भारतातील विविध कला मुख्यत्वे चित्रकला यांचा इतिहास, उगम, पद्धती यांविषयी विद्यार्थ्यांना माहिती मिळाली.

**कला –** कार्यशाळेमध्ये तबला वादन प्रशिक्षक श्री. शंकर चव्हाण यांनी इयत्ता चौथीतील विद्यार्थ्यांना तबला व डग्गा या दोन्ही वाद्यांची ओळख करून दिली व सराव घेतला. सर्व विद्यार्थ्यांना वैयक्तिक तबला वादनाचे प्रात्यक्षिक करावयास दिले व त्यामधील बारकावे स्पष्ट केले. प्रत्यक्षात तबला वादन करण्याचा अनुभव घेता आला त्यामुळे मुलांना अतिशय आनंद झाला. विद्यार्थ्यांमध्ये तबला वादनाची रुची द्विगुणीत करण्याकरिता प्रशालेमध्ये तबला वादनाचे वर्ग सुरू करण्यात आले आहेत.

या कार्यशाळेमध्ये कलाकृतीच्या सुशोभिकरणासाठी लागणारे विविध साहित्य हे शाळेमार्फत विद्यार्थ्यांना मोफत पुरविण्यात आले. सदर कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांसोबतच पालकांनीदेखील सहभाग नोंदवला होता. शाळेची माजी विद्यार्थिनी कु. मैथिली सुवारे हीदेखील प्रशिक्षक म्हणून या कार्यशाळेत सहभागी झाली होती. या सर्व कलाकृतींमधून विद्यार्थ्यांमधील कल्पकता, सर्जनशीलतेला प्रोत्साहन मिळाले.

या कलाकार्यशाळेच्या निमित्ताने विद्यार्थ्यांचा कार्य कौशल्य विकास, कार्यातील सुबकता, आकर्षकता याबाबतची कौशल्य विकसित करणे, त्याचबरोबर संयम, चिकाटी, मेहनत, एकाग्रता, अभिव्यक्ती यासारख्या गुणांची जोपासना करणे हाच एकमेव उद्देश या कार्यशाळेचा असतो.

## प्रसिद्ध कलाकारांच्या सादरीकरणातून भारतीय समृद्ध इतिहासाचे दर्शन :

यावर्षी या कार्यशाळेमध्ये विविध कला कौशल्यांसोबतच विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा आणि भारताच्या इतिहासातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा जिवंत अनुभव मिळाला.

याचा प्रारंभ आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे यांच्या शाहिरी पोवाड्याने झाला. शाहीर मावळे यांनी महाराष्ट्राला लाभलेल्या



*तबला वादन प्रशिक्षक श्री. शंकर चव्हाण*

शाहिरी परंपरेविषयी माहिती, पोवाड्याचा 'ज्ञानेश्वरी'तील उल्लेख, प्रथा व प्रकार यांचे विद्यार्थ्यांसमोर सोदाहरण सादरीकरण केले. चांगल्या विद्यार्थ्यांची लक्षणे सांगणारा स्वरचित, रंजक 'फटका' हा काव्यप्रकार सहकाऱ्यांसह सादर केला. छत्रपती शिवाजीमहाराज व धर्मवीर संभाजीमहाराज यांच्या पराक्रमाचे पोवाडे गाऊन 'जय जय महाराष्ट्र माझा' सारखी गीतं विद्यार्थ्यांना शिकवली.

या कार्यशाळेतील विशेष आकर्षण ठरले 'जिजाऊ – एकपात्री बहुरूपी नाट्याविष्कार' सुप्रसिद्ध लेखिका, निवेदिका व कलाकार सौ. सायली गोडबोले – जोशी यांनी राजमाता जिजाऊंचे प्रेरणादायी व नेतृत्वक्षम व्यक्तिमत्त्व विद्यार्थ्यांसमोर सादर केले. जिजाऊंच्या जीवनातील विविध टप्पे, बालपण, विवाह, शिवबांचा जन्म व संगोपन, स्वराज्याचे स्वप्न, धर्मनिष्ठा, राजकीय निर्णय क्षमतेसह त्यागमयी जीवन प्रभावीपणे साकारण्यात आले. प्रभावी अभिनय, संवाद व हावभावांद्वारे जिजाऊंच्या स्वभावातील खंबीर नेतृत्व, करारी बाणा, धाडसी वृत्ती, असे विविध पैलू विद्यार्थ्यांसमोर सादर करण्यात आले. त्यांच्या कार्यातून संघर्ष, धैर्य आणि यशाची शिकवण विद्यार्थ्यांना देण्यात आली.

बंगाली साहित्यिक बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी लिहिलेल्या 'वंदे



*आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे*




*‘जिजाऊ– एकपात्री बहुरूपी नाट्याविष्कार’*

मातरम्’ या राष्ट्रीय गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांसाठी ‘वंदे मातरम् १५०’ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. लेखक श्री. मिलिंद सबनीस लिखित आणि श्री. प्रसाद कुलकर्णी दिग्दर्शित ‘वंदे मातरम् १५०’ कार्यक्रमाचे अभिवाचन अभिषेक खेडकर, पल्लवी परब–भालेकर, प्रदीप फाटक यांनी केले. या कार्यक्रमात ‘वंदे मातरम्’ राष्ट्र गीताचा संपूर्ण इतिहास प्रभावीपणे उलगडला. सोबत पूरक म्हणून दृकश्राव्य माध्यमाद्वारे अनेक दुर्मिळ ऑडिओ, व्हिडिओ विद्यार्थ्यांना पाहावयास मिळाले. रविंद्रनाथ टागोर यांच्या आवाजातील १९०५मधील गायलेले ‘वंदे मातरम्’ ऐकण्याची संधीही विद्यार्थ्यांना मिळाली.

इतिहास कार्यशाळेतील कार्यक्रमांचा समारोप इतिहास संशोधन मंडळाचे तज्ज्ञ अभ्यासक श्री. पांडुरंग बलकवडे यांच्या अभ्यासपूर्ण व्याख्यानाने झाला. ‘शिवचरित्राचे सार आणि त्यातून घ्यावयाची प्रेरणा’ या विषयावर बोलताना त्यांनी शिवाजीमहाराजांची युद्धनीती, गनिमीकावा, पोर्तुगीजांची जहाजबांधणी तंत्र शिकून भारतीय ‘आरमार’ दलाची उभारणी, यांचा अभ्यासपूर्ण वेध घेतला. शाहिस्तेखानावर केलेली चढाई हा जगातील पहिला सर्जिकल स्ट्राईक होता, यासह अनेक ऐतिहासिक संदर्भ त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडले.

विविध अभ्यासपूर्ण व्याख्याने, सादरीकरणे यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात इतिहासाची, राष्ट्रभक्तीची व सांस्कृतिक मूल्यांची पक्की रुजवणूक झाली.

## जागतिक पर्यावण दिन –

### संवर्धन निसर्गाचे, उत्तरदायित्व आपले

लहानपणापासूनच विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाविषयी प्रेम निर्माण व्हावं, पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन करण्याच्या आपल्या जबाबदारीची जाणीव व दृष्टिकोन विद्यार्थ्यांना मिळावा याकरिता श्री विठ्ठलराव




*‘वंदे मातरम् १५०’– अभिवाचन अभिषेक खेडकर, पल्लवी परब–भालेकर, प्रदीप फाटक*



'शिवचरित्राचे सार आणि त्यातून घ्यावयाची प्रेरणा' या विषयावर बोलताना श्री. पांडुरंग बलकवडे

जोशी चॅरिटीज ट्रस्ट इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विविध पर्यावरण संवर्धन उपक्रमांचे आणि कृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. पर्यावरणाच्या रक्षणामध्ये जैवविविधता ही अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असते. वर्तमान युगामध्ये प्रचंड प्रमाणात होणाऱ्या वृक्षतोडीमुळे वन्य पशुपक्षांच्या अधिवासावरच, त्यांच्या अस्तित्वावरच प्रश्न निर्माण होत आहे.

चिमण्या जरी लहान असल्या तरी त्या भारताच्या परिसंस्थेसाठी आणि सांस्कृतिक वारशासाठी महत्त्वाच्या आहेत. कीटकांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यात, परागण करण्यास आणि बिया पसरवण्यात त्या महत्त्वाची भूमिका बजावतात, ज्यामुळे जैवविविधता वाढते आणि पर्यावरण संवर्धनाला आधार मिळतो. त्यांची घटती संख्या हा चिंतेचा विषय असून त्यांच्या संवर्धनासाठी प्रयत्नांची गरज आहे. आधुनिक इमारती, शहरीकरण आणि कृषी पद्धतींमधील बदलांमुळे त्यांच्या नैसर्गिक घरटे आणि खाद्यपदार्थांच्या जागा कमी झाल्या आहेत. SVJCT शाळेने चिमण्यांच्या संवर्धनाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता वाढवण्यासाठी या क्षेत्रात आपले योगदान देणाऱ्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌चे विद्यार्थी आणि उद्योजक डॉ. नंदन पाटीलहांडे यांच्या Sparrow Nest Feeder या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. डॉ. हांडेपाटील यांनी 'एला फाउंडेशन'ने घेतलेला 'पक्षी विज्ञान (Ornithology)' या विषयाचा अभ्यासक्रम पुण्याच्या 'भांडारकर इन्स्टिट्युट'मधून पूर्ण केला आहे. त्यांनी नैसर्गिकरीत्या उपलब्ध असणाऱ्या घटकांपासून घरटे बांधणी कशी करावी याचे प्रात्यक्षिक दाखवून इ. ८ वीच्या प्रत्येक विद्यार्थ्याकडून ते स्वतंत्र बनवून घेतले व चिमण्यांच्या संवर्धनाला प्रोत्साहन दिले.

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून इयत्ता पहिली आणि दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी SVJCT संस्थेचे शेत व शेततळे या ठिकाणी क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली. कृषी शास्त्रज्ञ डॉ. श्रीहरी हसबनीस यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना शेततळे, प्रकाश संश्लेषण, वृक्षारोपण या संकल्पनांची माहिती, उपयोग आणि महत्त्व सांगण्यात आले. रानभाज्या आणि औषधी भाज्या यांची माहिती सांगून या भाज्यांचे शरीराला होणारे फायदे विद्यार्थ्यांना समजावून सांगत कर्टुली या रानभाजीची लागवड विद्यार्थ्यांकरवी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या शंकांचे निराकरण करत वृक्षारोपण कार्यक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेत 'आजची शेतातली शाळा खूप आवडली' असे नमूद केले.

तसेच माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी शालेय परिसरात औषधी वनस्पतींचे वृक्षारोपण करून पर्यावरण दिन साजरा केला. ह्या विद्यार्थ्यांकरिता प्राणीशास्त्राचे प्राध्यापक डॉ. भास्कर मोरे यांचे Shocking Facts of Plastic Pollution आणि Vermiculture - Organic Farming या विषयांवर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. Shocking Facts of Plastic Pollution या चर्चासत्रामध्ये प्लास्टिकच्या अतिवापरामुळे होणारे दुष्परिणाम आणि ते कमी करण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजनांची माहिती सांगून Reuse, Reduce, Recycle या त्रिसूत्रीची माहिती दिली. तसेच



श्री. नंदन पाटीलहांडे – चिमणीचे घरटे कार्यशाळा



कृषी शास्त्रज्ञ डॉ. श्रीहरी हसबनीस – शेतातली शाळा




*प्रा. डॉ. भास्कर मोरे – पर्यावरण दिन*
*पर्यावरणाची त्रिसूत्री* – Reuse, Reduce, Recycle

पर्यावरणास अनुकूल कायदे, धोरणे आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर स्पष्ट केला. Vermiculture - Organic Farming या चर्चासत्रामध्ये शाश्वत विकासासाठी विद्यार्थ्यांना गांडूळ खताविषयी माहिती सांगत असताना गांडूळ खत निर्मिती प्रक्रिया, पद्धत, गांडूळ खताचा वापर व गांडूळ खत सर्वश्रेष्ठ कसे याविषयी माहिती सांगितली. तसेच नापिक जमिनीकरिता गांडूळ खत हा सर्वोत्तम उपाय आहे असे मत व्यक्त करून घरच्या घरी गांडूळ खत निर्मिती प्रक्रियेविषयी मार्गदर्शन केले.

पर्यावरण संवर्धन उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना मौल्यवान ज्ञान, कौशल्ये आणि दृष्टिकोन तर मिळतोच तसेच परस्परसंबंध, मानवी कृतींचा परिणाम, जबाबदारी, सहानुभूतीची भावनादेखील वाढते, ज्यामुळे पर्यावरणाचे रक्षण करण्यात त्यांचा सक्रिय सहभाग मिळतो.



*टाकाऊ घटकांपासून सुशोभिकरणाच्या कलाकृती*



*कोलाज*



*आकाश कंदिल निर्मिती*



*पिस्ता शेल्सपासून चित्रनिर्मिती*



*विविध विषयांवर भित्तचित्र*

# नाकाद्वारे मेंदूतील पाणी गळण्याच्या समस्येवर दुर्बिणीद्वारे यशस्वी शस्त्रक्रिया



*पेशंटसमवेत डावीकडून डॉ. मृदुल भटजीवाले (प्रमुख मेंदू शल्यचिकित्सक), डॉ. राजीव केणी (साहाय्यक प्राध्यापक ENT विभाग), डॉ. लीना ठाकूर आणि डॉ. अभिजित रोकडे भूलतज्ज्ञ, डॉ. गेसमंदार श्रीकांत (सर्जरी रेसिडेन्ट)*

बीकेएल वालावलकर रुग्णालयातील डॉक्टरांनी स्पॉन्टेनियस सेरेब्रोस्पायनल फ्लूइड (CSF) रायनोरिया या एका दुर्मिळ आणि जीवघेण्या आजाराचे निदान करून यशस्वी उपचार केले आहेत. या आजारामध्ये मेंदूतील पाणी नाकावाटे गळू लागते.

चिपळूण येथील एक ४४ वर्षांच्या महिलेला नाकातून सतत पाणी गळण्याचा त्रास होत होता. सुरुवातीला त्यांनी हे सर्दीचे लक्षण असल्याचे समजून दुर्लक्ष केले होते. मात्र, नंतर तपासणीसाठी त्या डेरवण रुग्णालयात आल्या असता तपासणीदरम्यान डॉ. राजीव केणी, साहाय्यक प्राध्यापक, ENT विभाग, यांनी त्यांना आजाराच्या गंभीरतेची जाणीव करून दिली. हा आजार डोकेदुखी, चक्कर येणे अशा त्रासांना कारणीभूत ठरू शकतो आणि नाकातील संसर्ग मेंदूपर्यंत पोहोचण्याचा धोका निर्माण करतो. त्यामुळे तातडीने उपचार सुरू करणे अत्यावश्यक आहे, असे डॉ. केणी यांनी सांगितले.

या निदानानंतर रुग्णाला तात्काळ मेंदू शस्त्रक्रिया विभागाकडे पाठविण्यात आले. डॉ. मृदुल भटजीवाले, प्रमुख मेंदू शल्यचिकित्सक, यांनी रुग्णाची सखोल तपासणी करून तातडीने उपचार व शस्त्रक्रियेचा निर्णय घेतला. डॉ. भटजीवाले यांनी पुढाकार घेत सीटी सिस्टर्नोग्राम ही विशिष्ट प्रक्रिया केली. या प्रक्रियेत रुग्णाच्या पाठीमधून मेंदूच्या द्रवामध्ये रंगद्रव्य (डाय) सोडले जाते आणि त्यानंतर सीटी स्कॅन केले जाते. यामुळे द्रव नेमका कुठून नाकात गळत आहे हे अचूक ओळखता येते. गळतीचे स्थान निश्चित झाल्यानंतर शस्त्रक्रियेची तयारी करण्यात आली.

या स्थितीवर दोन प्रकारच्या शस्त्रक्रिया शक्य असतात – उघडी मेंदू शस्त्रक्रिया किंवा नाकाद्वारे केल्या जाणारी एंडोस्कोपिक (दर्बिन) शस्त्रक्रिया. ही शस्त्रक्रिया कोणताही छेद किंवा व्रण न करता केली जाते. डॉ. राजीव केणी (ENT शल्यचिकित्सक), डॉ. मृदुल भटजीवाले (मेंदू शल्यचिकित्सक), तसेच डॉ. लिना ठाकूर आणि डॉ. अभिजीत (भूलतज्ञ) यांच्या बहुवैद्यकीय टीमने एंडोस्कोपीद्वारे गळती यशस्वीपणे थांबवली आणि उघडी मेंदू शस्त्रक्रिया टाळण्यात आली.

रुग्ण सध्या जलद आणि समाधानकारकरीत्या बरी होत असून, मेंदूतील पाणी गळण्याचे कोणतेही लक्षण राहिलेले नाही. त्यामुळे संभाव्य मेंदूच्या संसर्गाचा धोकाही टाळण्यात आला आहे. ही संपूर्ण शस्त्रक्रिया व रुग्णालयातील उपचार महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजनेअंतर्गत मोफत करण्यात आले.

आता डेरवणमध्ये जटिल व प्रगत ENT व मेंदू शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या करण्यात येत असून, रुग्णांना मोठ्या शहरांमध्ये जाण्याची गरज भासत नाही, ही बाब अत्यंत अभिमानास्पद आहे. ह्या शस्त्रक्रियेसंदर्भात डॉ. मृदुल भटजीवाले यांनी सांगितले की, आता वालावलकर रुग्णालयात पुणे, मुंबई सारख्या मोठमोठया रुग्णालयातून होणाऱ्या अतिशय अवघड शस्त्रक्रिया होऊ लागल्या आहेत. ह्याचे सर्व श्रेय संस्थेने उपलब्ध करून दिलेली अतिशय उच्च दर्जाची अशी उपचार यंत्रणा व सर्व डॉक्टर्स, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचारी यांचे सांघिक प्रयत्न यांना जाते.

## भ. क. ल. वालावलकर रुग्णालयाचे सोशल वर्कर यांना 'नमो सन्मान' पुरस्कार

शनिवार, दि. २१ जून २०२५ रोजी भारतीय जनता पार्टीच्या वतीने जागतिक योग दिनानिमित्त चिपळूण तालुक्यातील योगशिक्षक, डॉक्टर, वकील व सामाजिक क्षेत्रात काम करणारे सोशल वर्कर यांना 'नमो सन्मान' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सदर पुरस्कार सोहळ्यामध्ये भ.क.ल. वालावलकर रुग्णालय, डेरवण या रुग्णालयातील सोशल वर्कर श्री. सचिन गजानन धुमाळ व श्री. संकेत यशवंत जांभळे यांना 'नमो सन्मान' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्कार सोहळ्यासाठी डॉ. विनय नातू (माजी आमदार, गुहागर विधानसभा मतदारसंघ) हे उपस्थित होते.




*श्री सचिन गजानन धुमाळ नमो पुरस्कार स्वीकारताना*




*श्री संकेत यशवंत जांभळे नमो पुरस्कार स्वीकारताना, उजवीकडून तिसरे डॉ. विनय नातू*

# आशा सोडली होती, पण वेळेवर झालेल्या ENT शस्त्रक्रियेमुळे दृष्टी वाचली



*पेशंट समवेत डॉ. सिजा, डॉ. राजीव केणी आणि डॉ. प्रतीक शहाणे आणि अन्य कर्मचारी*

६८ वर्षांची महिला रुग्ण या भ.क.ल. वालावलकर वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, डेरवण येथील आपत्कालीन विभागात दाखल झाल्या. त्यांना डाव्या डोळ्यात आठवड्याभरापासून दिसणं बंद झाल्याची तक्रार होती, तसेच डाव्या डोळ्याची हालचाल मर्यादित झाली होती आणि डाव्या बाजूला डोकेदुखीही होती. वैद्यकीय विभागातील निवासी डॉक्टरांनी त्यांची तपासणी केली आणि ही केस डॉ. सुवर्णा पाटील, एम.डी. मेडिसिन व रुग्णालयाच्या वैद्यकीय संचालिका यांना कळवली. त्यांनी रुग्णाची सखोल तपासणी करून तात्काळ त्यांना ईएनटी विभागाकडे पाठवले. रुग्ण मधुमेहाचा (डायबेटीस) जुना रुग्ण असून साखरेचे प्रमाण नियंत्रित नव्हते. त्यामुळे त्या अत्यंत चिंतेत होत्या. त्यांची तात्काळ तपासणी डॉ. राजीव केणी (साहाय्यक प्राध्यापक), डॉ. प्रतीक शहाणे (साहाय्यक प्राध्यापक) आणि डॉ. सिजा (वरिष्ठ निवासी) ENT विभागाच्या टीमने केली. नाकाची एंडोस्कोपी करण्यात आली, मात्र त्यामध्ये काही ठोस निदान झाले नाही. त्यानंतर मेंदू, डोळा व सायनसचा एमआरआय आणि सीटी स्कॅन करण्यात आला. तपासणीत डाव्या स्पिनोइड सायनसमध्ये वाढणारा गाठीसारखा भाग दिसून आला. तो डाव्या ऑप्टिक नर्व्हवर दबाव टाकत होता. डोळ्याच्या बाहेरील भागात (extraconal compartment) ऑर्बिटल सेल्युलायटिसची सुरुवातीची लक्षणे होती. यामुळे डोळा हलवणाऱ्या medial rectus स्नायूवर परिणाम झाला होता. डॉ. राजीव केणी यांनी तातडीने रुग्णाची एंडोस्कोपिक सायनस सर्जरी करून ऑप्टिक नर्व्ह व ऑर्बिटचे decompression करण्यात आले. डॉ. लीना ठाकूर (साहाय्यक प्राध्यापक) आणि डॉ. अभिजित रोकडे यांच्या नेतृत्वाखाली ॲनेस्थेशिया टीमने संपूर्ण शस्त्रक्रिया अत्यंत सुगम आणि यशस्वी केली.

ही संपूर्ण उपचार प्रक्रिया महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजनेअंतर्गत मोफत करण्यात आली.

शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या तब्येतीत चांगली सुधारणा दिसल्याने केवळ ३ दिवसांत त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. १० दिवसांनी झालेल्या फॉलोअपमध्ये त्यांनी आनंदाने सांगितले की, डाव्या डोळ्यात प्रकाश जाणवतो आहे. डॉ. केणी यांनी समजावून सांगितले की पूर्ण दृष्टी येण्यासाठी काही वेळ लागू शकतो.

१५ दिवसांनी त्या पुन्हा ओपीडीमध्ये आल्या तेव्हा ''आता मला अस्पष्ट का होईना, पण दिसतंय. डोळ्यांची हालचालसुद्धा पूर्ववत झाली आहे. मी तर सगळी आशा गमावली होती, पण डॉक्टरांनी खूप तत्परतेने व मेहनतीने माझा उपचार केला.'' असे त्यांनी समाधानाने सांगितले. हा प्रसंग वालावलकर वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या ENT विभागासाठी अभिमानास्पद आहे.

## समर्थ नर्सिंग कॉलेज येथे ‘आहार क्रांती – विरुद्ध आहार’ विषयक माहितीपर सत्र



*डॉ. सुवर्णा पाटील नर्सिंग विद्यार्थ्यांच्या समवेत ‘विरुद्ध आहार’ या विषयावर चर्चा करताना*

एस.व्ही.जे.सी.टी.’चे समर्थ नर्सिंग कॉलेज, कासारवाडी येथे ‘आहार क्रांती – विरुद्ध आहार’ या विषयावर माहितीपर सत्राचे आयोजन दि. ४ जून २०२५ रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सुवर्णा पाटील (मेडिकल डायरेक्टर, बी.के.एल. वालावलकर रुग्णालय, डेरवण) यांनी उपस्थितांना संबोधित केले. त्यांनी ‘विरुद्ध आहार’ म्हणजे काय, त्याचे आरोग्यावर होणारे परिणाम, त्याचे जोखमीचे घटक तसेच आहारातील योग्य आणि अयोग्य संयोग यावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी आहार सुधारण्याच्या उपाययोजना आणि आरोग्यवर्धक जीवनशैली यावरही भर दिला.

कार्यक्रमाला समुदाय व पोषण विभागाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि नर्सिंग विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. कार्यक्रमाचे आयोजन समर्थ नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्य प्रोफेसर तेजल सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली झाले असून, या उपक्रमातून आरोग्यप्रद जीवनशैलीचा प्रसार घडविण्याचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला.

## समर्थ नर्सिंग कॉलेज येथे एम. एससी. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कार्यशाळा




*कार्यशाळेत सहभागी विद्यार्थी आणि प्रशिक्षक*

समर्थ नर्सिंग कॉलेज, कासारवाडी येथे दि. २६ एप्रिल २०२५ रोजी ‘मार्गदर्शन व समुपदेशन – सातत्यपूर्ण शिक्षण व व्यावसायिक विकासासाठी आजच्या पिढीमध्ये सक्षमता व आत्मसन्मान निर्माण करण्याचा मार्ग’ या विषयावर शैक्षणिक वर्कशॉपचे आयोजन करण्यात आले.

वर्कशॉपचे आयोजन श्री विनायक ढांगे (असिस्टंट प्रोफेसर ), प्रो. जेस्सी जेकब (उपप्राचार्य), प्रो. तेजल सुर्वे (प्राचार्य) यांच्या मार्गदर्शनाखाली एम.एससी. नर्सिंग प्रथमवर्षाच्या विद्यार्थ्यांनी केले होते. वर्कशॉपला जी.एन.एम. तिसऱ्या वर्षाचे, पी.बी. बी.एससी. दुसऱ्या वर्षाचे आणि बी.एससी. ५व्या सेमिस्टरचे विद्यार्थी उपस्थित होते. वर्कशॉपची सुरुवात दीपप्रज्वलनाने आणि स्वागतगीताने झाली. त्यानंतर वर्कशॉपचे प्रमुख वक्ते श्री. अनिकेत बिरजे (क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट, असिस्टंट प्रोफेसर, समर्थ एज्युकेशनल इन्स्टिट्युट), श्री. अमित पाटील (क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट, असिस्टंट प्रोफेसर, समर्थ एज्युकेशनल इन्स्टिट्युट,) आणि मिस शिवानी टाकळे(counselling psychologist ) यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. वर्कशॉपचा प्रमुख उद्देश विद्यार्थ्यांमध्ये मानसिक सक्षमता, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे हा होता. या कार्यशाळेत मान्यवर वक्त्यांनी आपले विचार मांडले.

मुख्य वक्ते श्री. अनिकेत बिरजे यांनी Promoting Resilience and Self Esteem in Today's Generation या विषयावर मार्गदर्शन करताना, मानसिक सक्षमता व आत्मसन्मानाचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी उदाहरणांसह विद्यार्थ्यांना प्रतिकूल परिस्थितीत टिकून राहण्याचे कौशल्य आत्मसात करण्याचे मार्ग सांगितले. त्यानंतर मिस शिवानी टाकळे यांनी Guidance in Promoting Positive Relationships या विषयावर प्रभावी सत्र घेतले. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये परस्परसंबंध सुधारण्याचे तंत्र, संवाद कौशल्य व भावनिक बुद्धिमत्तेचे महत्त्व अधोरेखित केले. श्री. अमित पाटील यांनी Use of Technology in Guidance and Counselling या विषयावर सत्र घेत तंत्रज्ञानाचा वापर करून मार्गदर्शन व समुपदेशन अधिक प्रभावी कसे करता येईल, यावर प्रकाश टाकला. ई-कौन्सिलिंग, ॲप्स आणि डिजिटल माध्यमांची माहिती दिली.

या वर्कशॉपमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मभान, आत्मसन्मान, सकारात्मक दृष्टिकोन आणि व्यावसायिक विकासाच्या दृष्टीने नवीन उर्मी निर्माण झाली. शेवटी एम. एससी. नर्सिंग प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे आभार मानले व प्राचार्यांनी असे उपक्रम भविष्यातही राबवण्याचे आश्वासन दिले.

# समर्थ नर्सिंग कॉलेजमध्ये श्री. पांडुरंग बलकवडे यांचे 'भारतीय संस्कृतीतील महिलांचे योगदान' या विषयावर व्याख्यान



प्रसिद्ध इतिहास संशोधक श्री. पांडुरंग बलकवडे व्याख्यान देताना

समर्थ नर्सिंग कॉलेज, कासारवाडी, येथे दि. १३ जून २०२५ रोजी 'भारतीय संस्कृतीतील महिलांची भूमिका व योगदान' या विषयावर प्रसिद्ध इतिहास संशोधक श्री. पांडुरंग बलकवडे यांचे एक प्रेरणादायी व्याख्यान नुकतेच आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाला नर्सिंगच्या विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. व्याख्यानात श्री. पांडुरंग यांनी प्राचीन काळापासून ते आजच्या आधुनिक युगापर्यंत महिलांनी भारतीय संस्कृतीमध्ये दिलेले मौल्यवान योगदान विशद केले. त्यांनी जिजाबाई आईसाहेब, सावित्रीबाई फुले, झाशीची राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर अशा अनेक स्त्री व्यक्तिमत्त्वांचे उल्लेख करत विद्यार्थिनींना प्रेरणा दिली.

महिलांनी केवळ कुटुंब सांभाळण्यातच नव्हे, तर समाजरचना, शिक्षण, आरोग्य व राष्ट्रनिर्मितीतसुद्धा मोठे योगदान दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आपल्या नर्सिंग क्षेत्रातील भूमिकाही सामाजिक परिवर्तनासाठी महत्त्वाची असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे संयोजन कॉलेजच्या प्राचार्य प्रोफेसर तेजल सुर्वे यांच्या सहयोगाने साध्य झाले. शेवटी उपस्थित विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि श्री. पांडुरंग बलकवडे यांचे मनःपूर्वक आभार मानले. हा कार्यक्रम विद्यार्थिनींसाठी एक विचारप्रवर्तक आणि प्रेरणादायी अनुभव ठरला.

# समर्थ नर्सिंग कॉलेजमध्ये मेनस्ट्रुअल हायजिन-डे निमित्त विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्र



समर्थ नर्सिंग कॉलेजच्या उपप्राचार्य प्रोफेसर जेस्सी जेकब आभार व्यक्त करताना

समर्थ नर्सिंग कॉलेजमध्ये 'मेन्स्ट्रुअल हायजिन-डे' निमित्त अल्बर्ट डेव्हिड लि. एजन्सीच्या 'सखी' या प्रोजेक्टअंतर्गत एक विशेष चर्चासत्राचे आयोजन दि. २८ मे २०२५ रोजी करण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. निहारिका राऊळ उपस्थित होत्या. त्यांचे व्याख्यान 'मासिक पाळीतील स्वच्छता आणि आरोग्याची काळजी' या विषयावर केंद्रित होते.

कार्यक्रमाचे आयोजन प्रोफेसर तेजल सुर्वे (प्राचार्य, समर्थ नर्सिंग कॉलेज, कासारवाडी) यांच्या मार्गदर्शनाखाली मिस नमिता धवन (नर्सिंग ट्यूटर) आणि सूत्रसंचालन मिस जुई देसाई (बी. एससी. नर्सिंगची विद्यार्थिनी) हिने केले. या कार्यक्रमासाठी डॉ. निहारिका राऊळ (MBBS, DGO) श्री. अमित नाटे, श्री. मंगेश मेणे आणि श्री. निखिल तेली (मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह) आणि शिक्षकवर्ग उपस्थित होते. सर्व पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. डॉ. निहारिका यांनी मासिक पाळी दरम्यान होणाऱ्या शारीरिक व मानसिक बदलांबरोबरच स्वच्छतेचे महत्त्व सांगितले. अनारोग्यदायी सवयींमुळे होणारे आजार, संसर्ग, वंध्यत्व यासारख्या समस्यांबद्दल त्यांनी उपस्थित नर्सिंग विद्यार्थिनींना जागरूक केले. त्यांनी पर्यावरणपूरक पाळी उत्पादने योग्य पद्धतीने वापरणे व त्याची विल्हेवाट लावणे याबद्दल उत्तम असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास कॉलेजचे शिक्षकवृंद आणि सर्व नर्सिंग विद्यार्थिनींची उत्स्फूर्त उपस्थिती होती. विद्यार्थिनींनी प्रश्नोत्तरांच्या सत्रात सक्रिय सहभाग घेतला. कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थिनींमध्ये मासिक पाळीच्या स्वच्छतेविषयी जागरूकता वाढवणे आणि आरोग्यदायी सवयी विकसित करणे हा होता. कार्यक्रमाच्या शेवटी कार्यक्रम आयोजकांनी सर्व विद्यार्थ्यांना भेटवस्तू दिल्या. शेवटी कॉलेजच्या उपप्राचार्यांनी सर्व पाहुण्यांचे आभार मानले.

## समर्थ नर्सिंग कॉलेजमध्ये 'आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन' उत्साहात साजरा



*नर्सिंग विद्यार्थ्यांनी शिक्षकांसाठी केक कापून परिचारिका दिनाचा आनंद साजरा केला*

समर्थ नर्सिंग कॉलेजमध्ये दिनांक १२ मे रोजी आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन मोठ्या उत्साहात आणि अभिमानपूर्वक साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक दीपप्रज्वलनाने करण्यात आली. संस्थेच्या प्राचार्या आदरणीय प्रोफेसर तेजल सुर्वे यांचा सन्मान करण्यात आल्यानंतर नर्सिंग विद्यार्थ्यांनी शिक्षकांसाठी केक कापून परिचारिका दिनाचा आनंद साजरा केला. याप्रसंगी प्राचार्यांनी आपल्या भाषणात फ्लॉरेन्स नाईटिंगेल यांच्या कार्याची आठवण करून दिली आणि विद्यार्थ्यांना सेवेचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी परिचारिकेच्या भूमिका आणि तिच्या समर्पणाचे कौतुक केले. तसेच कॉलेजमधील असिस्टंट प्रोफेसर श्री. विनायक ढांगेसर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नर्सिंग व्यवसायातील मोठेपणाची जाणीव करून दिली. त्यांच्या प्रेरणादायी भाषणाने उपस्थितांमध्ये आत्मविश्वास आणि अभिमान निर्माण झाला.

परिचारिका दिनानिमित्त आयोजित केलेली अभिनय स्पर्धा विशेष आकर्षण ठरली. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी नर्सेसची जीवनशैली, नर्सिंगमधील आव्हाने आणि त्यावर मात कशी करावी या संबंधित विविध सामाजिक आणि आरोग्यविषयक मुद्यांवर आधारित सादरीकरणांनी प्रेक्षकांची वाहवा मिळवली.

कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध आणि सुंदर पद्धतीने पार पडले. परिचारिका दिनाच्या निमित्ताने नर्सिंग व्यवसायातील समर्पण, सेवा आणि करुणेच्या मूल्यांना उजाळा देण्यात आला.

## वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा




दरवर्षीप्रमाणे भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयामध्ये दि. २१ जून २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षीचा विषय होता एक पृथ्वी । एक आरोग्य.

२१ जून रोजी वैद्यकीय महाविद्यालय, भौतिकोपचार महाविद्यालय व नर्सिंग कॉलेज यांच्या संयुक्त उपक्रमांनी संस्थेच्या अंतर्गत क्रीडा संकुलामध्ये विविध योगासन प्रात्यक्षिके व अभ्यास घेण्यात आले. एसव्हीजेसिटी इंग्लिश मीडियम शाळेतील विद्यार्थिनींनी योगा डान्स सादर केला तसेच विद्यार्थ्यांनी मल्लखांब प्रात्यक्षिक सादर केले. तसेच वैद्यकीय महाविद्यालय व भौतिकोपचार महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी भरतनाट्यम् व कथक हे नृत्य प्रकार सादर केले. या कार्यक्रमाला कुमारी तनवी रेडीज या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या निमित्ताने वैद्यकीय महाविद्यालयातील शारीरिक क्रियाशास्त्र विभागाने दोन दिवसांचा 'सर्टिफिकेट कोर्स इन योग अँड वेलनेस' आयोजित केला होता त्याला प्रथम वर्ष वैद्यकीय विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. याप्रसंगी डॉक्टर अद्वैत गोडसे, डॉक्टर प्रकाश जाधव, डॉक्टर सत्यजित कुंभार, डॉक्टर रश्मी सिंग, डॉक्टर अमर बारावडे यांनी मार्गदर्शनपर व्याख्याने दिली. या कोर्सची सांगता विद्यार्थ्यांकडून चलचित्र स्पर्धा (रिल्स कॉम्पिटिशन) व पारितोषिक वितरण समारंभाने झाली.



भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

# S.V.J.C.T. मध्ये तीन दिवसीय अन्नप्रक्रिया कार्यशाळेचे आयोजन

डेरवण येथील S. V. J. C. T. संस्थेमध्ये तीन दिवसांची अन्नप्रक्रिया (फूड प्रोसेसिंग) कार्यशाळा मोठ्या उत्साहात पार पडली. या कार्यशाळेसाठी दादर येथील ARANA Solutions या उद्योजक निर्मिती केंद्रातील प्रशिक्षकांनी मार्गदर्शन केले. ARANA Solutions ही संस्था आजवर २०,००० पेक्षा अधिक उद्योजक घडवणारे प्रतिष्ठित केंद्र मानले जाते.

या कार्यशाळेत डेरवण कोहोर्टमधील मुलींसह टेरव, चिपळूण व हडकणी परिसरातील मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यशाळेत अमृता महाजन यांनी फळे व भाजीपाल्याचे निर्जलीकरण (dehydration) व त्यापासून पावडर तयार करण्याच्या प्रक्रियेचे प्रशिक्षण दिले. या पद्धतीच्या माध्यमातून नाशवंत अन्नपदार्थ दीर्घकाळ टिकवता येतात.

याशिवाय, अनघा पालव यांनी नाचणी व बेसनाचे लाडू, नानकटाई, नारळ फ्लेवरची बिस्किटे इत्यादी पदार्थ कढईमध्ये तयार करण्याची पद्धत शिकवली. तसेच झटपट तयार होणाऱ्या इन्स्टंट फूड्स - इन्स्टंट मिसळ, साबुदाणा वडा, तसेच रेस्टॉरंट स्टाइल ग्रेव्ही यांची प्रात्यक्षिके सादर केली. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून सहभागी मुलींना आपल्या स्वयंपाककौशल्याचा वापर करून स्वतःचा छोटा व्यवसाय सुरू करण्याची प्रेरणा मिळाली. सरकारी योजनांच्या साहाय्याने महिलांना कमी भांडवलात व्यवसाय सुरू करता येतो, यासंदर्भात सुदेश देसाई यांनी मार्गदर्शन केले.

त्यांनी Udyam Registration, FSS-I नोंदणी, तसेच PMEGP, CMEGP, PMFME यांसारख्या महत्त्वाच्या आर्थिक योजनांची माहिती दिली. यासोबतच प्रॉडक्ट कॉस्टिंग, मार्केट शोधण्याच्या रणनीती आणि व्यवसायवृद्धीच्या संधींविषयीही माहिती देण्यात आली. या कार्यशाळेमुळे कोकणातील स्थानिक, पोषक व दुर्मिळ फळे, भाज्या आणि वनस्पतींचा वापर करून स्थानिक पातळीवर व्यवसाय सुरू करण्याची दिशा मुलींना मिळाली आहे. ही कार्यशाळा केवळ अन्नप्रक्रियेचे प्रशिक्षण नसून, कोकणातील महिलांना आर्थिक सक्षमीकरणाच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.




*अमृता महाजन विद्यार्थिनींना प्रशिक्षण देताना*



*अनघा पालव विद्यार्थिनींना प्रशिक्षण देताना*

**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक :** श्री. विकास कमलाकर वालावलकर यांनी धनश्री ऑफसेट, ३/२०८, पत्रकार कॉलनी, कुवारबाव, रत्नागिरी येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, डेरवण, पो. सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६०६ येथून प्रकाशित केले.Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०
नोंदणी क्रमांक : MAHMAR/2022/86035